# प्रेस नोट

ला.प्र.वि, जळगाव
दि.०२/०२/२०२६.

१) लोकसेवक श्री लिलाधर शिवाजीराव देशमुख, उप कृषी अधिकारी, वर्ग–३, पिंपळगाव २, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाचोरा, जि.जळगाव, २) संजय प्रभाकर पाटील, व्यवसाय–व्यापार, रा.आंबेवडगाव, ता.पाचोरा, जि.जळगाव, (खाजगी इसम), ३) नितीन इंदलसिंग निकम, व्यवसाय–मजुरी, अ.क्र.२ व ३ रा.आंबेवडगाव, ता.पाचोरा, जि.जळगाव, (खाजगी इसम),यांचेवर यशस्वी सापळा कारवाई केले बाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | जळगाव |
| फिर्यादी | रेश्मा चंद्रकांत अवतारे, वय ३५ वर्षे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.नंदुरबार, कॅम्प–ला.प्र.वि., जळगाव |
| पोलीस ठाणे व गुन्हा नोंद क्रमांक | पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशन जि.जळगाव गु.र.नं. /२०२६ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ प्रमाणे |
| लाचेची मागणी रक्कम | ६,०००/– रूपये |
| स्विकारली रक्कम | ५,०००/– रूपये |
| थोडक्यात हकिगत | मुळ तक्रारदार हे जोगेवडगाव, ता.पाचोरा येथील रहिवासी असुन ते परिवारासह गावात राहतात. तक्रारदार यांनी शासन योजनेअंतर्गत शेती व्यवसायासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी कृषी विभागामार्फत सबसीडी मिळत असल्याने त्यांनी नांगर व रोटर खरेदी करणेकामी सबसीडी मिळणेकरीता पाचोरा कृषी कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने अर्ज केला होता. सदर कार्यालयाकडुन नमुद साहित्य खरेदी करण्यासाठी मंजुरी मिळाल्याने त्यांनी नांगर व रोटर खरेदी केले होते.सदर खरेदी केलेल्या साहित्याचा कृषी उप अधिकारी, कृषी कार्यालय, पाचोरा विभाग, जळगाव यांचेसोबत फोटो काढुन ते योजनेच्या वेबसाईटवर ऑनलाईन अपलोड करून अनुदान मिळवुन देण्यासाठी लिलाधर देशमुख,कृषी उप अधिकारी,पाचोरा यांनी तक्रारदार यांचेकडे ६,०००/–रूपये लाच मागणी करून नमुद लाच रक्कम ही संजय पाटील,धनदाई कृषी केंद्र,आंबेवडगाव यांचेकडे देणेबाबत सांगितले होते.त्याबाबत तक्रारदार यांनी त्यांचे विरूध्द आज दि.०२/०२/२०२६ रोजी लाप्रवि जळगाव घटकाकडे तक्रार दिली होती.<br><br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची आज दि.०२/०२/२०२६ रोजी पंचांचे समक्ष पडताळणी केली असता आलोसे देशमुख यांनी कामाचे फोटो काढुन ते योजनेच्या वेबसाईटवर ऑनलाईन अपलोड करून अनुदान मिळवुन देण्यासाठी यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ६,०००/– रूपये लाच मागणी करून तडजोड अंती ५,०००/– स्विकारण्याचे मान्य करून ते खाजगी पंटर संजय पाटील, धनदाई कृषी केंद्र, आंबेवडगाव यांचेकडे देण्यास सांगितले.<br>आलोसे देशमुख यांनी सांगितले प्रमाणे तक्रारदार हे सदर लाच रक्कम संजय पाटील यांना देण्यासाठी त्यांचे धनदाई कृषी केंद्र, आंबेवडगाव येथे गेले असता ते दुकानावर नसल्याने आलोसे देशमुख यांचे सांगणे प्रमाणे सदर लाच रक्कम ही दुकानावर हजर असलेले नितीन निकम यांना सदरची रक्कम लाचेची असल्याचे जाणीव असतांनाही त्यांनी लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन आलोसे लिलाधर देशमुख, आरोपी खाजगी इसम संजय पाटील व नितीन निकम यांचेविरूध्द पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

| | |
|---|---|
| | **पर्यवेक्षण अधिकारी**– श्री.योगेश ठाकूर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., जळगांव.<br>**सापळा अधिकारी** – श्रीमती रेश्मा अवतारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., नंदुरबार, कॅम्प–ला.प्र.वि.जळगांव.,<br>**सापळा मदत पथक** – पोनि/हेमंत नागरे, श्रेणी पो.उप निरीक्षक दिनेशसिंग पाटील, सुरेश पाटील (चालक ) पोकॉ/प्रदिप पोळ, पोकॉ/राकेश दुसाने, नेम.ला.प्र.वि.जळगांव<br>**तपास अधिकारी**– श्री.योगेश ठाकूर, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.जळगांव |
| मार्गदर्शन | **१) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री.माधव रेड्डी,अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आहवान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र नाशिक येथे सपंर्क करावा.

सपंर्क पत्ता :– ला.प्र.वि.कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव

संकेतस्थळ :– acbmaharastra.gov.in

ई मेल/ऑनलाईन तक्रार :– spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com

टोल फ्रि क्रमांक :– १०६४, हॉट्सअप मोबाईल क्रमांक :– ७५८८६६१०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२५७–२२३५४७७ पो.उप अधीक्षक योगेश ठाकूर ९७०२४३३१३१